


***Dr. Kakasaheb Ramrao Surwase***

*Professor & Head, Department of Marathi*

*BSS Arts, Science & Commerce College Makni*

*Tah. Lohara Dist.* ***Osmanabad-413604***


*(Maharashtra)*

*Mob : 8275304981, 9421872171*

*Email : dr.krsurwase@gmail.com*

## BATY MARATHI (OPT) PAPER XIV

# मराठी व्याकरण : स्वरूप व परंपरा



# भाषेच्या विविध व्याख्या :-

१)  श्री.न. गजेंद्रगडकर यांच्या मते " यादृच्छिक ध्वनि संकेतावर आधारलेली समाजव्यवहाराला साहाय्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा".

२) रा.सो.सरराफ यांच्या मते  " भाषा म्हणजे सांकेतिक परंतु परंपरागत मौखिक प्रतीकांचा सामाजिक आंतर व्यवहारा करिता उपयोगात येणारा आकृतिबंध होय."

३) कृ.पा. कुलकर्णी यांच्या मते  "भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनीचा समूह होय."

४)  ना.गो.कालेलकर यांच्या मते "मुळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या  ध्वनिसंकेतांनी बनलेली समाज व्यवहारास साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धत आहे."

५) र.बा. मंचलकर यांच्या मते "समाज व्यवहाराचे विनिमय साधन असलेली भाषा ही एक यादृच्छिक ध्वनि संकेताची मानवी पद्धत आहे."

६) गोसावी /  वैद्य यांच्या मते "परस्पर सहकार्य आणि विनिमयासाठी मानवी मुखातून प्रकटलेल्या यादृच्छिक ध्वनि संकेत पद्धतीस भाषा असे म्हणतात."

# भाषेची वैशिष्ट्ये / लक्षणे :

१) भाषा ही दैनंदिन व्यवहाराचे साधन आहे.

२) आत्मनिवेदन आणि आत्म प्रगटीकरणाचे साधन आहे.

३) भाषाही विनिमयाचे श्रेष्ठ साधन आहे.

४) भाषा ही ही एक सामाजिक संस्था आहे.

५) भाषा ही सर्वमान्य आहे.

६) ध्वनि  युक्त भाषा.

७) भाषा ही संकेतावर आधारलेली आहे.

८) भाषा ही अर्जित संपत्ती आहे.

९) भाषा ही प्रतीकात्मक आहे.

१०) यादृच्छिकता.

# व्याकरण म्हणजे काय

"व्याकरण म्हणजे भाषेची रचना.“

व्याकरण म्हणजे भाषेमागील रहस्य नीटपणे समजावून घेणे.“

व्याकरण हा शब्द 'वि + आ + कृ = (= करण) असा बनलेला आहे. अर्थ - भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र असा होतो.

आपल्या भाषेची भाषारचना कशा पद्धतीने होते याचा विचार येथे अभिप्रेत असतो. अगोदर भाषा निर्माण झाली आणि तिच्यातील व्याकरणाचा विचार नंतर केलेला आढळतो

व्याकरण म्हणजे काय?

१) डॉ. अशोक केळकर यांच्या मते "व्याकरण म्हणजे एका विशिष्ट भाषेची व्यवस्था आणि त्या विशिष्ट व्यवस्थेच्या पद्धतशीर अभ्यासाचे फलित, व्यवस्थेचे वर्णन होय.”

२) "व्याकरण म्हणजे शब्दानुशासन.” (पतंजलि)

३) "व्याकरण म्हणजे भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र."

४) "व्याकरणशास्त्र म्हणजे भाषेचे नियमन."

५) “शब्दातील वर्ण, त्यांचे उच्चार, शब्दसिद्धी, प्रयोग इ. बाबतीत नियम घालून देणारे शास्त्र म्हणजे व्याकरण होय."

६) "व्याकरण म्हणजे भाषाव्यवहाराचे नियमन करणारे शास्त्र होय.' (शालेय मराठी शब्दकोश - संपा. वा. शि. आपटे)

७) "व्याकरण म्हणजे आपल्या भाषेतील शब्दांच्या शुद्ध रूपांचा विचार.''

८) “लोकांच्या बोलण्याचा नीट अभ्यास करून भाषा कशी बोलली जाते, याविषयी जे नियम शोधून काढण्यात येतात, त्यांनी होणारे मार्गदर्शन म्हणजेच व्याकरण.” (ना. गो. कालेलकर - भाषा आणि संस्कृती)

९) “शब्दकोशांतील शब्द भाषेत येऊन वावरू लागतात, तेथे व्याकरणाचे क्षेत्र सुरू होते.”

१०) “सामान्यपणे व्याकरण म्हणजे भाषाव्यवहार ज्या नियमांनी ठरविला जातो, ते नियम स्पष्ट करणारे शास्त्र होय. पतंजलीने व्याकरणासाठी ‘अनुशासन' असा विशिष्ट शब्द वापरला आहे. 'अनुशासन' म्हणजे नियमांतून तयार झालेली शिस्तबद्ध पद्धती होय.”

११) “व्याकरण म्हणजे शब्दशास्त्र."

# मराठी भाषा व व्याकरण:-

भाषा हा मानवी समाजजीवनाचा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. त्याद्वारेच आपल्या मनातील विचार सहजतेने व्यक्त होतात. म्हणूनच विचार आविष्कृत करण्याचे प्रभावी साधन म्हणून भाषेकडे पाहिले जाते. भाषेत व्यक्त केलेले विचार इतरांना कळावेत, यासाठीच असतात. हे विचार स्पष्ट, सुलभ व अचूक रीतीने व्यक्त झालेले असतील तर ते दुसऱ्यांपर्यंत विनासायास पोहोचतात.

आपले विचार दुसऱ्यांना व दुसऱ्यांचे विचार आपणांस समजण्यासाठीच भाषा या माध्यमाचा उपयोग केलेला आढळतो. त्यामुळेच भाषा एका विशिष्ट व ठरावीक पद्धतीने बोलली किंवा लिहिली जाणे आवश्यक ठरते. भाषेत एकसूत्रीपणा असेल तरच ती चिरकाल टिकून राहते.

यासाठी भाषेत काही तत्त्वे अथवा नियम तयार केलेले असतात, यांनाच आपण सामान्यपणे 'व्याकरण' ही संज्ञा वापरतो. दैनंदिन व्यवहार सुकर व्हावा, यासाठी भाषेत काही संकेत तयार केलेले असतात. भाषा व्यवहार ज्या नियमांद्वारे होतो, ते नियम समजावून देणारे शास्त्र किंवा पद्धत म्हणजे 'व्याकरण' होय.